# पोलीस स्टेशन लोणार

आज दिनांक 11/02/2025 रोजी पोलीस स्टेशन लोणार येथे नविन कायदे संदर्भाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेमध्ये भारतीय न्याय संहिता-2023, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता- 2023 आणि भारतीय साक्ष अधिनियम, 2023 यातील कायदेशीर तरतुदी, I.T.Act मधील तरतुदी, तसेच सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर व महिला संबंधी घडणारे अपराधाया संबंधाने घ्यावयाची दक्षता, अनुसुचीत जाती जमाती अधिनियम, ,सायबर क्राईम, लैंगीक अत्याचारापासुन बालकांचे संरक्षण अधिनियम, दारुबंदी अधिनियम बाबत सविस्तर माहिती देवुन जनजागृती करण्यात आली.

सध्या समाजामध्ये सोशल मीडिया व इतर प्रसार माध्यमांद्वारे सुरू असलेल्या अराजकतेबाबत सतर्क राहणे, सायबर क्राईम मध्ये आरोपींच्या फसवणुकीच्या पध्दती, अशा घटनांपासून स्वतःचा बचाव करणे याबाबत पोलीस निरीक्षक श्री.निमीष मेहेत्रे यांनी  मार्गदर्शन केले . या कार्यशाळेला पोलीस पाटील तसेच शहरी व ग्रामीण भागातील प्रतिष्ठीत नागरीक हजर होते.




स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०